**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला**

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in

**क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि।59 /2020** **दिनांक: 30/ 03 /2020**

**वाचा** — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. फौजदारी प्रक्रिया संहिता — 1973 चे कलम 144 अंतर्गत आदेश दिनांक 22.3.2020
6. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/का 97/2020 दिनांक 23.3.2020
7. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 98/2020 दिनांक 23.3.2020
8. गृह मंत्रालय भारत सरकार यांचे आदेश दिनांक 29.3.2020

**( सह जिल्हा निबंधक कार्यालयातील खरेदी विक्री व्यवहार दिनांक 14.4.2020 पर्यंत बंद ठेवणे बाबत. )**

# आदेश

**ज्याअर्थी,** शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड — 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणुमूळे (COVID-१९) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** अकोला जिल्हयातील सर्व दुय्यम निंबधक कार्यालयातील व्यवहार ऑनलाईन पध्दतीने स्थावर मालमत्ते संदर्भात दस्तऐवज नोंदणीचे दैनंदिन कार्यालयीन कामकाज केल्याजाते. सदर कामकाज हे संगणकीय पध्दतीने बायोमेट्रीक मशीनद्वारे करण्यात येत असल्यामुळे कोरोना विषाणूचा प्रसार व संसर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरचे व्यवहार दिनांक 31.3.2020 पर्यंत बंद ठेवण्याकरिता आदेश पारीत करणेस सह. जिल्हा निंबंधक वर्ग-1 अकोला यांनी विनंती केलयानुसार या कार्यालयाचे आदेश दिनांक 23.3.2020 अन्वये दिनांक 23.3.2020 ते दिनांक 31.3.2020 या कालावधीकरिता सर्व जिल्हयातील खरेदी विक्रीचे व्यवहार बंद ठेवण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** अकोला जिल्हयातील सर्व दुय्यम निंबधक कार्यालयामध्ये अकोला जिल्हयातील विविध ठिकाणावरुन तसेच अकोला जिल्हयाबाहेरुन देखील व्यक्ती येत असतात. यामूळे कोरोना विषाणूचा संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता, त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसंर्गात अधिक वाढ होवू न देता उपाययोजना राबविणे आवश्कय आहे. त्याकरिता दुय्यम निंबंधक यांच्या आस्थापनेच्या ठिकाणी होणा-या गर्दीमुळे आपत्तीजन्य परिस्थिती अकोला जिल्हयात उद्भवू नये या करिता सर्व व्यववाहर बंद ठेवणे बाबत सह जिल्हा निंबधक अकोला यांनी कळविले आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** गृह मंत्रालय भारत सरकार यांचे आदेश दिनांक 29.3.2020 मध्ये नमुद केल्यानुसार कोविड-19 या विषाणूचा प्रार्दुभाव व फैलाव रोखण्यासाठी तसेच कोरोना विषाणूचा संसंर्गावर नियंत्रण ठेवण्यासाठी संचारबंदी लागू करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** अकोला जिल्हयात कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून संपूर्ण अकोला जिल्हयामध्ये फौजदारी पक्रिया संहिता 1973 चे कलम 144 चे आदेशानुसार दिनांक 14.4.2020 पर्यंत मनाई आदेश पारीत करण्यात आले आहे.

**त्याअर्थी,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचनेनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकरानुसार मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** अकोला जिल्हयातील सर्व दुय्यम निंबधक कार्यालयामध्ये अकोला जिल्हयातील विविध ठिकाणावरुन तसेच अकोला जिल्हयाबाहेरुन देखील व्यक्ती येत असतात. यामूळे कोरोना विषाणूचा संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता, त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसंर्गात अधिक वाढ होवू या करिता जिल्हयातील **सह जिल्हा निबंधक कार्यालयातील खरेदी विक्री संदर्भाने होणारे व्यवहार दिनांक** 14.4.2020 **पर्यंत बंद करण्याचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.**

**(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)**
**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

NitinN 143

**प्रतिलिपी-**

1. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
3. सह जिल्हा निबंधक ------------------------------------------ सर्व
4. उपविभागीय अधिकारी ------------------------------ सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
5. तहसिलदार --------------------------------------- यर्च यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
6. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर बातमी विनामुल्य प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याकरिता.

जिल्हादंडाधिकारी, अकोला

जिल्हादंडाधिकारी, अकोला

जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय

सत्यमेव जयते